# इतिहास लेखनातील नविन प्रवाह : सामान्यांचा इतिहास (Subaltrn History)

**प्रा. डॉ. शहाजहान शेख**
**इतिहास विभाग प्रमुख , आझाद महाविद्यालय, औसा .**



**प्रस्तावनाः**
आतापर्यंत आपण इतिहासाकडे पाहण्याचे कांही पूर्वापार चालत आलेले दुष्टिकोण पाहिले. आता आपल्याला अलीकडील काळातील नवा इतिहास विषयक दृष्टिकोण पाहावयाचा आहे. आधुनिक काळात इतिहास हे एक सामाजिक शास्त्र म्हणून विकसित झाले आहे. **'निव्वळ घटनांचा तपशील गोळा करुन त्यांची कालानुक्रमे मांडणी केली म्हणजे इतिहास'** ही कल्पना आता मागे पडली आहे. घटिताना बोलते करुन त्यांच्या पासून निष्कर्ष काढण्याचे काम इतिहासकाराला करावे लागते. घटिते हा इतिहासाचा कच्चा माल आहे असे म्हटल्यास गैर ठरणार नाही. ज्या घटना समाजाच्या पृष्ठभागावर दिसतात त्यांच्या मुळाशी वेगवेगळे कार्यकारणभाव दडले असण्याची शक्यता आहे. वेगवेगळ्या गटांचे हितसंबंध सुध्दा या घटितामधुन दिसून येतात. पूढे येणाऱ्या घटितांना प्रश्न विचारल्याशिवाय त्यांची उत्तरे मिळू शकत नाहीत. त्यांचे स्पष्टीकरण करण्यासाठी एखादी सिध्दांत कल्पना मांडावी लागते. प्रत्येक घटनेमागे एक विचार असतो तो विचार त्या काळातील विचारप्रमाणालींनी व भौतिक परिस्थितीने प्रेरित असतो. अशा विचारांचे विश्लेषण करणे ही कळाची गरज असते.[1]

भारतामध्ये विविध स्तरांवर इतिहासलेखन झाले त्यामध्ये राष्ट्रवादी , सैध्दांतिक चौकटीमध्ये लिखाण झाले, तथापि, भारताचे अंतरंग या लेखनप्रक्रियेत दिसत नाही. भारतीय समाजातील जात, वर्ग, जातीविरोधी चळवळी, सामाजिक, धार्मिक चळवळी, ब्राह्मणेतर चळवळ यांच्यावर इतिहासकारांनी योग्य प्रमाणात लक्ष केंद्रित केले नाही. हे लिखाण पुरुष प्रधान लेखनच आहे फुले, आंबेडकर, मतुआपंथ, नामशुद्र चळवळ, स्वाभिमान चळवळ यांचा विचार आजपर्यंतच्या लेखनामध्ये झ ाालेला नाही.

1950 ते 60 या काळात भारतीय विचारपरंपरेवर डाव्यांचा प्रभाव दिसतो. मार्क्सवादी विचारपरंपरेत भारताचा इतिहास पुन्हा लिहिण्याचा प्रयत्न अनेकांनी केला, त्यांमध्ये कॉम्रेड श्रीपाद अमृत डोंगे, रजनी पामदरा, ए. आर. देसाई, डी.डी. कोसंबी यांचा समावेश करावा लागेल व राजकीय क्रांती की, सामाजिक क्रांती या द्वैतामध्ये राजकीय विषयास महत्त्व देण्यात व त्यानुसार लिखाण करण्यात आले. सामाजिक विषय मागे पडला. मार्क्सला. प्रमुखपदी स्वीकारुन विशिष्ट तऱ्हेने अन्वयार्थ लावण्याची प्रक्रिया सरु झाली. Past and present सारखी जर्नल्स, हील, थॉम्पसन यांच्या लिखाणातून भारतीयांना प्रेरणा मिळाली. गेल ऑमव्हेट यांनी आज या सकंल्पनेला केंद्रस्थानी मानून मार्क्सवादाच्या चौकटीत लिखाण केले. स्त्रीवादी लिखाणालाही याच कळात मान्यता प्राप्त झाली. या विविध विचारप्रवाहांमध्ये 1982 पासून सबल्टर्न स्टडीजची सुरुवात झाली.[2]

**सबल्टर्न दृष्टीकोण :-**

सर्व सामान्यांनी रुढ अर्थाने कदाचित इतिहास निर्माण केला नसेल म्हणून काय गतकालीन वाटचालीत त्यांचे कांहीच योगदान नसेल? इतिहास काय फक्त प्रभावी सर्चस्व गाजवणाऱ्याकडून एकट्याने निमार्ण होतो ? असे प्रश्न प्रस्थापित इतिहासाच्या परिशिलनातून निर्माण झाले. त्या परिशिलनाने एक नवा विचारप्रवाह सुरु झाला. आतापर्यतचा इतिहास अशा प्रभावी घटकांची नोंद घेतो ज्यांनी इतिहास निर्माण केला. हे प्रभावीगट नेहमीच लक्षणीय ठरले. या गटांच्या अभ्यासातून इतिहासाकडे पाहिले गेले. एका अर्थाने हा इतिहास आपण वरच्या थरातून अभ्यासतो. अशा प्रकारच्या इतिहास अवलोकनामुळे प्रभावी असा घटक यांचीच वाटचाल आम्ही रेखाटतो. त्यामुळे होते असे की नोंद सेनापतींची होते त्यांच्या कार्याचा गाजावाजा होतो. यश त्यांच्या नावेच नोंदवले जाते, आणि प्रत्यक्षात लढणारा पराक्रमी सैनिक मात्र अनुल्लेखाने मारला जातो. लढाईतल्या यशात असे सेनापतीचे नतृत्व, त्याने आखलेले डावपेच महत्त्वाचे असतात तितकेच किंबहुना त्यापेक्षा अधिक सैनिकांचे Subaltarn गटाचे पराक्रम, त्याने दिलेली शर्थीची लढत महत्त्वपूर्ण ठरते.[3] आता पर्यंतच्या इतिहास लेखनात इतिहासकारांनी या नेमक्या गोष्टीचे भाने ठेवले नाही आणि परिणामी वर्तमानातल्या Subaltan म्हणजे सर्वसामान्य गौण घटकाला दुर्लक्षित केले गेले ही भावना साहजिकच निमार्ण झाली.

**इतिहासाचे डी- इलीटायझेशन :-**

या भावनेचे प्रगटीकरण म्हणजे इतिहसाच्या डी इलीटायझेशन ची मागणी होय. इतिहसातील नोंद वरच्या थरातून म्हणजे राजा, सेनापती, समाजातील प्रभावी गट, सत्ता गाजविणारा घटक, यांच्यातून न घेता, सामान्य अतिसामान्य अशा स्तरावर काम करणाऱ्या, पराक्रम गाजवणाऱ्या तळागाळातल्या घटकातून घेतली जाती असा विचार पुढे येवु लागला आहे. History from below असा तो विचार आहे.

हा विचार पाश्चात्य देशात **अन्टोनिओ ग्रामची, फ्रान्टस् कनान, जीन चेझनाक्स, इरिक हाब्सबॉन, जॉर्ज रुड** आणि इतर काही अभ्यासकांनी मांडला,

**अन्टोनिओ ग्रामची याची भुमिका :-**

अन्टोनिओ ग्रामची या अभ्यासकाने भावी इतिहासंकारांना असे आवाहन केले आहे त्यांनी गतकाळाची वाटचाल रेखाटतांना, समग्र भुमिका स्वीकारुन प्रभावी गटाबरोबरच दडलेला गेलेला दुय्यम गट म्हणेजच सर्वसामान्य गौण माणूस यांच्याही प्रेरणांचा मार्ग काढावा, Be an integral Historian and join the

ranks of organic Intellectuals in recongnising every trace of independent initiative on the part of the subaltern group, rather than reproducing. The minds and analysing the actions of the dominant groups.' या शब्दात त्याने हि भुमिका मांडली आहे.[4] इटालीयन कम्युनिस्ट पक्षाचा संस्थापक असलेला अ‍ॅन्टोनिओ ग्रामची सबाल्टर्न जाणिवांना प्रगट करणारा एक विचारवंत म्हणून ख्यातनाम झाला त्याने. Prinson Note book या नावाचा ग्रंथ प्रकाशित केला. या ग्रंथातून त्याने इटालीतील तुरंगात शिक्षा भोगीत असलेल्या कैद्याच्या मुलाखती घेतल्या. व त्या आधारे तुरंगातील दैनदिनी लिहिली. मुसोलिनीच्या काळातील इटालीयन पाश्वभूमीवरचे त्याचे लिखाणही गाजले. फॅसिस्ट विजयाची त्याची कारणमिमांसा उल्लेखनीय राहिली. त्याच्या या सर्व लिखाणातून व चिंतनातून एक नवा विचार ज्याला इंग्रजीत Euro communisum म्हणता येईल असा विकसित होत आला. या विचारातूनच Subltarn Studie म्हणजेच सर्व सामान्यांच्या गौणत्व असलेल्यांच्या अभ्यासाची कल्पना विकसित झाली.

Subalernity या इंग्रजी शब्दाचा अर्थ आहे. Subordination. म्हणजेच गौणत्व किंवा खालचा दर्जा, याचा अर्थ ताबेदारी असाही होतो. गौणत्व किंवा ताबेदारी हा शब्द व्दैती संबंध सूचित करणारी संकल्पना आहे. या व्दैती संबंधाची दुसरी बाजू आहे. Domination श्रेष्ठत्व, किंवा उच्च दर्जा. याचा अर्थ कुणावर तरी सर्चस्व गाजवणारा गट असाही होतो [5]. इतिहासाच्या हजारो वर्षाच्या वाटचालीत हे दोन घटक सातत्याने अस्तित्वात राहिले. एक वर्चस्व गाजवणारा घटक व दुसरा वर्चस्व गाजवुन घेणारा. ताबेदारी घटक या दोन्ही घटकांची रचना मोठी, गुंतागुंतींची असते. वर्चस्व हे ताबेदार हा घटक असेल तरच शक्य असते. किंबहुना गौणत्व स्वीकारणारा म्हणजेच ताबेदारी मानवणारा दुय्यम घटक समाजात आहे. म्हणूनच वर्चस्व गाजवणाराला अस्तित्व आहे. या दोन घटकामधले संबंधही मोठे गुंतागुंतीचे ठरतात. त्यात कांही प्रमाणाता पाठपुरावा, मनधरणी आहे तर कांही प्रमाणात जबरदस्तीही. तसेच ताबेदारी साधी सरळ गोष्ट नाही. त्यातही गंतागुंत Complexity आहेच, सहचर्य आहेच तसेच विरोधही आहे.

तात्पर्य वर्चस्व आणि गौणत्व सूचित करणाऱ्या घटकांमध्ये संबंध अत्यंत गतागुंतीचे Complex of Complexes या स्वरुपाचे आहेत. इतिहास विषयक हा नवा दृष्टीकोन या घटकांच्या संबंधातील आंतरक्रिया स्पष्ट करु इच्छितो. हे करतांना ताबेदार असा दुय्यम गट जो आहे त्या घटकाला इतिहास चिंतनाचा केंद्रबिंदू मानून त्यांच्या जाणीवा, शब्दबध्द करण्याचा त्याचा प्रयत्न असतो, हा सामान्याच्या इतिहासाचा शोध असला तरी तो केवळ लोकेतिहासाचा शोध नसतो तर समाजातल्या वर्चस्व गाजवणाऱ्या गटाचे व ताबेदार गटाचे अंतर प्रवाह स्पष्टपणे रेखाटण्याचा आणि दुय्यम गटाला इतिहास प्रतिपादनात प्राधान्य देण्याचा प्रयत्न असतो.[6]

### सबल्टर्न इतिहासलेखनाचे स्वरुप :-

सबल्टर्नवादी इतिहासकारांनी सबल्टर्न जाणीव केंद्रस्थानी ठेवून इतिहास लिहिण्याचा उद्देश आपल्यापुढे ठेवला आहे. पार्थोचटर्जी म्हणतात, अभिजनवादी इतिहासस नकार दिल्यानंतर रिकाम्या जागेवर सबल्टर्न जाणिवेच्या इतिहासाची मांडणी करण्याची जबाबदारी सबल्टर्न इतिहासकारांची आहे. अभिजनवादी वर्गाच्या पुढाकाराने राजकीय प्रतिकार व चळवळी घडलेल्या नाहीत असे सबल्टर्नवादी लोकांचे मत आहे. म्हणून सबल्टर्न हे इतिहासाचे कर्ते बनले आहेत. सबल्टर्न चळवळी वाढत्या शोषणविरुध्द झाल्या अशी त्यांची भूमिका आहे. त्यांचा हा विरोध अधिसत्तेची केंद्रे व प्रतीके यांच्यावरील हल्ल्यातून स्पष्ट होतो.[7]सबल्टर्न जाणीव ही स्वायत्त (Suigeneries) असते अशी ही भूमिका आहे. सामंती सत्तापध्दती, भांडवली सत्तापध्दती व समुदाय सत्तापदती यांचे विवेचन करुन समुदाय सत्तापध्दतीचा वापर सबल्टर्न पध्दतीने केला ही बाब पार्थों चटर्जीनी मांडली. सबल्टर्न इतिहासकारांनी विविध पध्दतींचा वापर करुन इतिहास लिहिला. उदा. हॉब्जव्‍यॅमची सामाजिक गंडगिरी (Social banditry)इ.पी.थॉम्पसन यांची इतिहासातील मूक सूर (Unsuns Voices of History) एडवर्ड सैद यांची पौर्वात्यावाद (Orientalism) देरिदाची विरचना (Deconstruction) इ. फुकोच्या पुरातत्त्व विषयी संशोधनाचा वापर करुन 'ज्ञानातून येणाऱ्या इतरांवरील नियंत्रणाचे चित्रण इतिहसकारांची केले आहे.' सबल्टर्न इतिहासकारांनी मानववंश शास्त्रे,सरंचनावादी, उत्तर - संरचनावादी, भाषाशास्त्र, ज्ञान-सत्ता संबंध इ. अभ्यास पध्दतींचा अभ्यास करुन इतिहासलेखन केले.

### सबल्टर्नचे मूल्यमापन / निष्कर्ष :-

सबल्टर्न इतिहासाचे मूल्यामापन करीत असताना आपणास पूढील मुद्दे लक्षात ध्यावे लागतात.

1) आधुनिकतेपासून भारतीय संस्कृत वाचविण्याचा प्रयत्न त्यांनी केला.
2) समुहामध्ये संस्कृतीचा सार दाखविण्याचा प्रयत्न यांनी केला.
3) वर्गसंकल्पनेला स्थान न देता Communit, Post- modern, Post- Structural पध्दतीचा वापर करुन इतिहास लिहिला.
4) उत्तर आधुनिक (Post-modern) दृष्टिकोणातून लिखाण केल्यावर प्राच्या त्म जगात प्रतिष्ठा मिळाली.
5) वर्चस्वाचा सांस्कृतिक अर्थ लावला गेला. त्याचे सामाजिक, आर्थिक बाबींशी परस्परसंबंध शोधणे बाजूला पडले.
6) सबल्टर्न आणि स्वायत्ता ह्या संकल्पना अमूर्त बनल्या.
7) नंतरच्या काळात साचेबंद व संदर्भहीन असे लिखाण होऊ लागले.
8) वर्ग (Class) ऐवजी वंचित किंवा समूह हा शब्द घेऊन प्रश्न सुटले नाहीत.
9) सिध्दांताच्या नावाखाली लिखाण जास्तीत जास्त अमूर्त झाले.
10) सबल्टर्न लिखाणात लहान परिप्रेक्ष्य, एतद्देशीय समूह व तुटलेपणा (Fragments) ही वैशिष्ट्ये आली.
11) वर्चस्व व स्वायत्तता यांची फारकत करणे हे वैशिष्ट्य बनले.
12) जात, वर्ग, लिंगभाव यांच्या परस्परसंबंधाचा विचार झाला नाही.
13)अभिजन-वंचित अशा शब्दाऐवजी वसाहतीस एतद्देशीय समुह आणि पश्चिमात्य तिसरे जग अशा शब्दांचा वापर सुरु झाला.
14) सबल्टर्न लिखाण पाश्चात्य सांस्कृतिक वर्चस्वाचा प्रश्न होऊन लागले.
15) फुले, आंबेडकर, पेरियार यांच्या चळवळीकडे दुर्लक्ष झाले.
16) जाती चळवळीकडे लक्ष दिले नाही.
17) सर्व लिखाण इंग्रजीमधून झाल्याने राष्ट्रीय, प्रादेशिक संवाद होऊ शकला नाही.

**संदर्भ सूची :-**

1) डॉ. बी.एन. सरदेसाई - ***इतिहासलेखन पध्दती,*** कोल्हापूर फडके प्रकाशन, तृआ ऑ.2011, पृ.क. 186
2) उपरोक्त - पृ . क्र. 187
3) डॉ. प्रभाकर देव-***इतिहास एक शास्त्र,*** नांदेड, कल्पना प्रकाशन, प्रथमावृत्ती 1997, पृ.क. 280
4) उपरोक्त - पृ.क्र. 287
5) प्रकाश चंद्र व्यास -***इतिहास लेखन शास्त्र,*** लातूर, अभिजीत प्रकाशन, प्रथमावृत्ती 1999, प्र.क्र.288
6) उपरोक्त - पृ.क्र. 290
7) आर.डी. गायकवाड, बी.एन सदेसाई, , व्ही एन हनमाने-***इतिहास लेखन शास्त्र,*** कोल्हापूर, फडके प्रकाशन, तृतियावृत्ती,1990, पृ.क्र.264
8) डॉ. मानिक लाल गुप्त -***इतिहास लेखन धारणाचे एवं पध्दतीयाँ,*** कानपूर, अमित पब्लिकेशन, प्रथम आवृत्ती 2004 पृ.क्र. 161.